# चंद्रपूर जिल्हा पोलीस वार्तापत्र

## पोलीस अधीक्षक कार्यालय, चंद्रपूर.


Email : sp.chandrapur@gmail.com, sp.chandrapur@mahapolice.gov.in

१५ में, २०२०

☎ : 07172-264300

: 07172-255800

: 7276494810 (PRO)


# स्थानिक गुन्हे शाखेची सुंगधित तंबाखू विरोधी कार्यवाही एकुण १६ लाख रु. किमंतीचा सुगंधीत तंबाखु जप्त

स्थानिक गुन्हे शाखा, चंद्रपुर यांचे पथकांना मिळालेल्या माहीतीनुसार पडोली, चंद्रपुर व पोंभुर्णा येथे छापा टाकत बाजारभावाप्रमाणे एकुण १६ लाख रु.चा सुंगधित तंबाखू जप्त करुन तिन इसमांवर कार्यवाही करण्यात आली आहे.

१) काल दि. १४ मे २०२० रोजी चंद्रपुर शहर हद्दीमध्ये सुपर मार्केटजवळ भिवापुर वार्ड, चंद्रपुर येथे छापा टाकुन आरोपी इसम नामे नरेंद्र राघोबाजी दुपारे वय ५२ वर्ष रा. भिवापुर वार्ड, चंद्रपुर याचेकडुन एकुण ३०,४०० रुपयाचा सुगंधित तबांखू जप्त करण्यात आला. त्याचप्रमाणे आज दिनांक १५ मे २०२० रोजी स्थागुशा येथील पथकाने पुढील कार्यवाही केलेली आहे.

२) पोस्टे पडोली हद्दीमध्ये नुरी मस्जीदजवळ छापा टाकुन आरोपी नामे आरीफ हारुण कोलसावाला वय ४२ वर्ष रा. मुल रोड चंद्रपुर याचेकडुन एकुण १५,३७,००० रुपयाचा सुगंधित तबांखू जप्त करण्यात आला.

३) पोंभुर्णा येथे कार्यवाही करुन आरोपी नामे सचिन नानाजी लेकलवार वय २८ वर्ष रा. पोंभुर्णा याचेकडुन ३३,००० रु. चा सुगंधित तबांखू जप्त करण्यात आला असुन सदर बाबत अन्न व औषध प्रशासनास कार्यवाही बाबत कळविण्यात आले आहे.

सदरची कार्यवाही पोलीस अधीक्षक चंद्रपुर डॉ. महेश्वर रेड्डी यांचे मार्गदर्शनामध्ये पोलीस निरीक्षक ओमप्रकाश कोकाटे स्थागुशा चंद्रपुर याचे नेतृत्वामध्ये, पोउपनि सचिन गदादे यांचेसह पथकातील प्रमुख सफौ भोयर, जाधव, पोहवा भुजाडे, करकाडे व पथकामधील कर्मचारी यांनी केली आहे. कोविड १९ च्या पार्श्वभुमिवर नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टीकोनातुन स्थानिक गुन्हे शाखा येथील पोलीसांनी केलेली तंबाखु विरोधी कार्यवाही ही अत्यंत महत्वपुर्ण आहे.

---